# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 186/2024 दिनांक : 28.05.2024**

## 1)गंभीर दुखापत :–

**1)सिंदखेड :–**दिनांक 25.05.2024 रोजी 01.15 वा. ते 01.30 वा.चे दरम्यान, **मौ. गोंड वडसा ता. माहुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून गैरकायदयाची मंडळी जमवुन तुझी बायको आमच्या बायाची बदनामी करते या कारणावरून शिवीगाळ केली व लाथा बुक्यांनी मारहाण करून आरोपीतांनी लोखंडी रॉड,गुप्ती ,काठीने दोन्ही पायावर,डोक्यात मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अब्दुल मोहीत अब्दुल खयुम, वय 42 वर्षे, व्यवसाय चालक रा. गोंड वडसा ता. माहुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरन 47/2024 कलम 326,,504,506,147,148,149 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2106 पठाण, मो. नं. 9309574775** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–**दिनांक 22.05.2024 रोजी 13.00 वा. सुमारास, **मौ. चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून सुनिल कांबळे यांचे गायरान जमिनीमध्ये कडबा टाकल्याचे कारणावरून शिवीगाळ केली व लाथा बुक्यांनी व काठीने मारहाण करून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी विठ्ठल गायकवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 164/2024 कलम 326,324,323,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/चव्हान, मो. नं. 7020408595** हे करीत आहेत.

## 2)जुगार :–

**लोहा :–** दिनांक 26.05.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **पांगरी ते पेणुर रोडच्या बाजुस शिवारात ता.लोहा जि.नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 2800/–रूपये व जुगाराचे साहित्यासह दोन मोटारसायकल किंमती 1,20,000/–रू असा एकुण किंमती 1,22,950/–रू मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/विश्वदिप रामचंद्र रोडे, ने.लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 163/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2325 किरपणे, मो.नं. 9881708474** हे करीत आहेत.

## 3)प्रोव्हिबीशन :–

**अर्धापुर :–** दिनांक 26.05.2024 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **माळी रोडवर ता. अर्धापुर जि.नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू व विदेशी दारू एकुण किंमती 5010/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/मिर्झा अखिल समद बेग, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 253/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2353 बोधमवाड,मो.नं.9022978909** हे करीत आहेत.

## 4)पाण्यात बडुन मृत्यु :–

**किनवट :–**दिनांक 27.05.2024 रोजी 14.00 वा.ते 17.00 वा.चे दरम्यान, **पैनगंगा नदी मारेगाव खालचे शिवार ता.किनवट जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे 1)स्वाती देविदास कांबळे, वय 12 वर्षे 2)पायल देविदास कांबळे, वय 15 वर्षे, 3)ममता जावेद शेख, वय 18 वर्षे,रा. सर्व मारेगाव खालचे, ता.किनवट जि. नांदेड** हे पैनगंगा नदी पात्रात शिवनापाणी खेळ खेळत असताना त्यांना पोहता येत नसल्याने खोल पाण्यात गेल्याने पाण्यात बुडून मरण पावले. वगैरे **खबर देणार** देविदास हरी कांबळे **वय 44 वर्षे व्यवसाय मजुरी रा. मारेगाव खालचे, ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. 19/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/मामीडवार, मो.नं. 9850061133** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 87 / 2024 दिनांक : 28.05.2024**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"स्वातंत्र्यवीर सावरकर"** यांची जयंती साजरी

28 मे, 2024 मंगळवार रोजी **"स्वातंत्र्यवीर सावरकर"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **श्री नामदेव रिठठे** पोनि यांनी **"स्वातंत्र्यवीर सावरकर"** यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री शंकर डेडवाल**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन,**पोकॉ / मारोती कांबळे, विनोद भंडारे**, यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

